# ग्रंथालय व माहितीशास्त्रातील करिअर


■ **डॉ. शालिनी लिहितकर**

काही निवडक क्षेत्रे व त्यातील करीअरच्या संधी सोडल्या तर विद्यार्थी व पालकांना करिअरच्या इतर पर्यायांबाबत फारशी माहिती नसल्याचे चित्र दिसते. अशीच एक सक्षम, समृद्ध आणि आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर दिवसेंदिवस विकसित होणारी व करिअरच्या व्यापक संधी उपलब्ध असणारी ज्ञानशाखा म्हणजे ग्रंथालय व माहितीशास्त्र. ग्रंथालय व माहितीशास्त्राची व्याप्ती ग्रंथालयातील ग्रंथांच्या नुसत्या मांडणीपुरती मर्यादित नसून या विषयाला आधुनिक तंत्रज्ञान व माहितीशास्त्राची भक्कम जोड आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र या करिअर क्षेत्राची व या विषयातील पदवी, पदव्युत्तर, एमफिल व पीएचडी. या पातळींवर तब्बल ५५ वर्षे दर्जेदार प्रशिक्षण देणाऱ्या शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र या अधिविभागाची ओळख या लेखात करून दिली आहे.

'माहिती' या शब्दाला जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. सध्याच्या माहिती तंत्रज्ञान युगात 'माहिती' प्रचंड वेगाने व विविध स्वरूपांत प्रकाशित होत आहे. ग्रंथालय व ज्ञानस्त्रोत केंद्रांमार्फत प्रकाशित माहितीचे मुद्रित प्रलेख व ई- रिसोर्सेच्या माध्यमातून संगठन व व्यवस्थापन केले जाते. नंतर वाचकांच्या माहिती गरजेनुसार ही माहिती अंतिम उपभोक्त्यापर्यंत प्रभावीपणे संप्रेक्षित केली जाते. हे कार्य करण्यासाठी ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाचे शास्त्रीय प्रशिक्षण घेतलेल्या तज्ज्ञ व सक्षम ग्रंथपाल व माहिती व्यवसायिकांची गरज असते. यातूनच ग्रंथालय व माहितीशास्त्र या ज्ञानशाखेला अधिक महत्त्व प्राप्त होत आहे. सर्वसामान्यपणे इतर ज्ञानशाखांचा तुलनात्मक विचार करता ग्रंथालय व माहितीशास्त्र क्षेत्रात सध्या नोकरीच्या व्यापक संधी उपलब्ध असल्याचे दिसते. अलीकडेच राष्ट्रीय ज्ञान आयोगाने ग्रंथालयांच्या बाबतीत अनेक महत्त्वपूर्ण शिफारसी सुचविल्या आहेत. त्यातील जवळजवळ सर्व शिफारसी केंद्र सरकारने स्वीकारल्याही आहेत. साहजिकच यांसारख्या ग्रंथालय व माहितीशास्त्र या क्षेत्राला हितकारक असणाऱ्या धोरणांमुळे भविष्यात नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत.

## नोकरीच्या संधी

ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील पदवी व पदव्युत्तर प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, सार्वजनिक ग्रंथालये, विशेष ग्रंथालये, संग्रहालये, माध्यम कार्यालये, शासकीय व निमशासकीय संस्था, संशोधन संस्था, खासगी संस्था, कार्पोरेट



मटा एज्युकेशन

कंपन्या, शासकीय पुराभिलेखागार, भारतीय सैन्यदल, रुग्णालये, बँका व वित्तीय संस्था, प्रकाशन संस्था, धार्मिक संस्था आदी ठिकाणी सहायक प्राध्यापक, ग्रंथपाल, उप-ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, वरिष्ठ ग्रंथालय सहायक, माहिती व्यवस्थापक, माहिती विश्लेषक, माहिती अधिकारी, माहिती शास्त्रज्ञ, तांत्रिक अधिकारी, प्रलेखन अधिकारी इ. सारख्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

याबरोबरच संशोधन क्षेत्रातील अचूक, विश्वसनीय व योग्य स्वरूपातील माहितीची गरज विचारात घेता विविध संशोधन संस्थांमध्येही ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील पदवीधारकांना नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. उदा. आयआयटी, एनआयटी, सीएसआयआर, डीआरडीओ, इस्रो, डीआरटीसी इ. सारख्या संशोधन संस्थांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होतात.

पदव्युत्तर प्रशिक्षण व सेट किंवा नेट ही पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय, विद्यापीठ व तत्सम प्रकारच्या ग्रंथालयांमध्ये ग्रंथपाल ('शिक्षक' समकक्ष) व सहायक प्राध्यापक म्हणूनही नोकरी करता येते.

## प्रशिक्षण संस्था

ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील आधुनिक व दर्जेदार प्रशिक्षण देणारी एक संस्था म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र या विभागाची ओळख आहे. विभागाची स्थापना १९६४ साली झाली. विभागामार्फत ग्रंथालय व माहितीशास्त्र या नोबल प्रोफेशनमध्ये ज्यांना करिअर करायचे आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी बीएलआयएस्सी, एमएलआयएस्सी, एमफिल व पीएचडी हे नियमित कोर्स राबविले जातात. २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात विभागातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सीबीसीएस प्रणालीनुसार पुनर्रचना करण्यात आली आहे. सध्याच्या अभ्यासक्रमात ग्रंथालय व माहिती केंद्रांचे व्यवस्थापन, ज्ञान संगठन, शैक्षणिक ग्रंथालय प्रणाली इ. सारखे मूलभूत विषय तर आहेतच. शिवाय त्याबरोबर माहिती साक्षरता, पुराभिलेख, संग्रहालये व पुरातत्त्वशास्त्रीय माहिती प्रणाली, ग्रंथालय व माहिती व्यवसायिकांसाठी कौशल्य, माहिती धोरण आणि कायदे, वेब तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक प्रकाशन, डिजिटल माहिती व्यवस्थापन, तांत्रिक लिखाण, सायंटोमेट्रिक्स यांसारखे आधुनिक काळाशी सुसंगत, कौशल्य व प्रात्यक्षिक आधारित विषयही समाविष्ट केले आहेत. सध्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागात दोन डिजिटल क्लासरूम, हायस्पीड इंटरनेट कनेक्टिव्हीटी व इतर अद्ययावत सुविधा असणारी संगणक प्रयोगशाळा, प्रशासकीय कार्यालय, फॅकल्टी / रिसर्च फेलो केबीन्स, गर्ल्स कॉमनरूम इ. भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. विभागातील पूर्णवेळ, अनुभवी व निष्णांत प्राध्यापकांबरोबर ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील तज्ज्ञ व नामवंत व्यक्तींच्या व्याख्यानांचेही विभागामार्फत नियमितपणे आयोजन केले जाते. सेमिनार, परिषदा, सेट/ नेट वर्कशॉप, करिअर मार्गदर्शन व समुपदेशन इ. सारख्या उपक्रमांबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वंकष विकासासाठी वाचन कट्टा, क्वीझ कॉम्पिटीशन, पोस्टर प्रेझेंटेशन, व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण व सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन विभागातर्फे केले जाते. प्रवेशित विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या हॉस्टेल, ग्रंथालय, प्रशस्त अभ्यासिका, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, हायस्पीड वाय-फाय इंटरनेट कनेक्शन इ. सारख्या महत्त्वपूर्ण सुविधांचाही लाभ मिळतो. विभागातील अनेक माजी विद्यार्थी देशभरातील नामवंत विद्यापीठ, संशोधन संस्था व ग्रंथालयांमध्ये प्राध्यापक, माहिती शास्त्रज्ञ व ग्रंथपाल इ. चांगल्या हुद्द्यांवर कार्यरत आहेत.

(लेखिका विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या प्राध्यापक व विभागप्रमुख आहेत.)

### विभागातील कोर्सेस व आवश्यक शैक्षणिक पात्रता

- बॅचलर ऑफ लायब्ररी अँड इन्फरमेशन सायन्स (बीएलआयएस्सी), प्रवेश क्षमता : ४०
- शैक्षणिक अर्हता : कोणत्याही शाखेची पदवी
- मास्टर ऑफ लायब्ररी अँड इन्फरमेशन सायन्स (एमएलआयएस्सी), प्रवेश क्षमता : २०
- शैक्षणिक अर्हता : मान्यताप्राप्त विद्यापीठाची बॅचलर ऑफ लायब्ररी अँड इन्फरमेशन सायन्स पदवी

### कोर्सेससाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वपूर्ण बाबी

- कोर्सेससाठी विद्यापीठामार्फत प्रवेश परीक्षा घेतली जाते.
- प्रवेश परीक्षा ऑनलाइन स्वरूपामध्ये घेतली जाते.
- प्रवेश परीक्षा तारीख : २८/५/२०१९
- सविस्तर माहितीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील 'Admission 2019' या लिंकला भेट द्या.

# बाराव्या शतकातील बुद्ध

प्रा. शिवाजीराव भुकेले

बाराव्या शतकात सर्व प्रथम कर्नाटकात उदय पावलेल्या धर्मसुधारणेतील नवविचारांची चळवळ नंतर पूर्ण दक्षिण महाराष्ट्र, मराठवाडा, आंध्रप्रदेश, तमिळनाडू आणि केरळ प्रांतापर्यंत पोहोचली, याचे पारमार्थिक श्रेय बाराव्या शतकातील बुद्ध, महात्मा बसवेश्वरांना दिले जाते. कारण बसवेश्वरांनी आपल्या वीरशैव लिंगायत धर्मात ज्या तत्त्वज्ञानाचा, आचार- विचार, नितीचा सदुपयोग केला. त्याचाच उपयोग काही शतकांपूर्वी वर्धमान महावीर आणि गौतम बुद्धांनी केला होता. बुद्ध आणि महावीर यांचा काळ वेगळा असला तरी बसवेश्वरांनी स्थळ-काल परत्वे ज्या इष्टलिंग धर्म प्रतिपादनाचे वर्णन केले ते वैचारिकदृष्ट्या गौतम बुद्धांच्या विचारांशी मिळते जुळते आहे. म्हणूनच बसवेश्वरांना १२ व्या शतकातील बुद्ध म्हणून संबोधले जाते.

कुशाग्र बुद्धी, जिज्ञासा, रूढी-परंपरेला नाकारण्याची बंडखोरी या स्वाभाविक प्रवृत्तींमुळे अवघ्या ८ व्या वर्षी व्रतबंधास नाकारण्याचे काम बसव्वाण्णांनी केले होते. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर केवळ धार्मिक अंधश्रद्धा व विचारशुन्यतेच्या आधारे शोधायचे नसते तर त्याला चिकित्सेच्या साणेवर घासून पुसून पाहणाऱ्या बसवाण्णासमोर न्हाव्याने केस कापल्यावर माणूस का बाटतो? चांभाराने शिवलेले जोडे घरात घेताना गोमूत्र शिंपडून का घेतले जातात? स्वतःस सर्वश्रेष्ठ समजाणारी माणसे दुष्काळाच्या छायेतही दुसऱ्यास ओंजळभर पाणी का देत नाहीत? म्हादबा हा माणसासारखा माणूस असूनसुद्धा त्याचा विटाळ दुसऱ्यांना का होतो असे अनेक अनाकलनीय प्रश्न ज्यांच्या मनात उभे राहिले त्या बसवाण्णांनी स्त्री-पुरूष समानतेचा उद्‌घोष करणाऱ्या व पददलितांना त्यांच्या खरा अधिकार देणाऱ्या श्री वीरशैव लिंगायत धर्माचे पुरूज्जीवन करण्याचे काम केले.

**महात्मा बसवेश्वर यांची आज (मंगळवार) जयंती, त्यानिमित्त त्यांच्या वचनसाहित्याचा आढावा...**

## जातीय विषमतेला विरोध

समाज व्यवस्थेला लाभलेला अनादी अनंत रोग म्हणजे जातीयवाद. बसवाण्णांनी १२ व्या शतकाच्या प्रारंभीच जातीअंताचा लढा आचरणातून आरंभीला होता. मधुवारस ब्राह्मणाची मुलगी कलावती व हरळय्या चांभाराचा मुलगा शीलवंत यांच्या विवाहाद्वारे जातीअंताच्या लढ्याचे रणशींग बसवाण्णांनी फुंकले. बसवेश्वरांनी केलेला हा विद्रोह व्यवस्थेला सहन झाला नाही म्हणून बसवाण्णांना बिज्जळाचे प्रधानपद सोडावे लागले. परंतु जात, वर्ण व स्पृश्य-अस्पृश्यतेच्या खुळचट कल्पनेबद्दल बसवाण्णा म्हणाले होते,

खाण्या-पिण्यात झाला म्हणती क्रियाहिन।
कन्या देण्या-घेण्यात हुडकती जात-पात।
कसा म्हणू तयांना भक्त?
कसा म्हणू तयांना मुक्त ?
ऐक-बा कुडलसंगम देवा ॥

भक्तीच्या क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक क्षेत्रातही जोपर्यंत जातीवादाची पादत्राणे घालून आम्ही पुढे जात राहणार असु तर आम्हाला जातीभेदविरहीत समाजरचनेचे स्वप्न रंगविणारे बसवेश्वर समजलेच नाहीत, असे म्हणावे लागेल.



## समतावादाचा अग्रदूत

उदात्त जीवनमूल्यांचे आचरण स्वतः करून ते शिवशरणांच्या कडूनही करवून घेणारे महात्मा बसवेश्वरांनी जात व वर्ण रहित समाजाची संकल्पना आपल्या जगण्यातून दुसऱ्यांसमोर ठेवली. मंगळवेढयात असताना शिवशरणासोबत ते स्वतः नागीदेव कांबळे यांच्या घरी भोजनास जात. एवढेच नव्हे तर ढोर कक्कय्याला ते वडिलकीचा अधिकार बहाल करीत तर मातंग चन्नय्याला आजोबा म्हणत. खरेच राजर्षी शाहू महाराजांनी गंगाराम कांबळेला नुसते हॉटेलच काढून नाही दिले तर स्वतः तिथे जाऊन चहा पिऊ लागले याची समतावादी नाळ बसवण्णांच्या विचारधारेशी मिळतीजुळती आहे. परंतु त्यांच्या या कार्यापासून तुमच्या माझ्यासारखी सत्ता, संपत्ती, जात, वर्ण यांच्यामागे लागलेली माणसे हजारो योजने दूर आहेत. आमच्या लेखी माणुस हा जातीयवादाच्या उतरंडीत बसवायचा असतो आणि जे मडके जास्त खळखळ करेल त्याला फोडून टाकण्याची व्यवस्थाही आमच्याकडे आहे.

## श्रमपूजा हीच शिवपूजा

महात्मा बसवेश्वरांनी निर्माण केलेली शरणसंस्कृती म्हणजे मध्ययुगीन कालखंडातील श्रमसंजीवनीच होती. त्यांचा अनुभव मंटप तर समतावादी विचारांची प्रयोगशाळा व श्रमिकांची श्रमशाळा होती. अनुभव मंटप हे बसवाण्णांच्या विचारांचे संस्कारपीठ व शरण संस्कृतीचे मुक्त विद्यापीठ होते.

## अवैदिक परंपरेचा बंडखोर निर्माता

होम, हवन, यज्ञ-याग, कर्मकांड व बहुदेववाद तसेच हिंसात्मक प्रवृत्तीला विरोध करणारे बसवेश्वर पहिले क्रांतिकारी धर्मविचारक होते. भारतासारख्या देशात आजही देवच देव चोहीकडे व गेला माणूस कुणीकडे अशी अवस्था आहे. बहुदेहवादाचे इथे एवढे स्तोम माजलेले आहे की, झाडावर देव, झाडाखाली देव, रस्त्यावर देव, रस्त्याच्या कडेला देव असे देवांचे पिक ज्या देशात माजले आहे त्या देशात एकच इष्टलिंग पूजा प्रकाराचे वर्णन करून बहुदेववादाच्या प्रवृत्तीवर बसवेश्वरांनी हल्ला चढवला.

## स्त्री मुक्तीचा उद्‌गाता

समाजशास्त्रीयदृष्ट्या स्त्रीमुक्तीचा विचार हा अत्याधुनिक मानला जातो. परंतु, स्त्रयांना मुक्तीचे पंख देणारा भारतातील समतेचा जनक म्हणून १२ व्या शतकातील बसवेश्वरांच्या विचाराकडे पाहता येईल. ज्या स्त्रियांच्या पायात परंपरेच्या बेड्या अडकवल्या होत्या. चूल आणि मूल या कार्यक्षेत्रपलीकडे ज्यांचे विश्वच नव्हते, पारमार्थिक क्षेत्रात स्त्री अनर्थाचे महाद्वार आहे, असे मानले जात होते त्या कालखंडात महात्मा बसवेश्वरांनी अनेक स्त्री वचनकारांना व अलमप्रभु, चन्नबसवेश्वर, सिद्ध रामेश्वर अशा अधिकारी पुरूषांना एकत्र आणून स्त्री-पुरूष समानतेचा पाया रचण्याचे काम केले. बसवण्णांनी जो पाया रचला त्यावर खऱ्या अर्थाने कळस चढविण्याचे काम वैराग्य योगीनी अक्कमहादेवी, आयदक्की लक्कम्मा, रेवम्मा यांच्यासारख्या स्त्री वचनकारांनी केले. म्हणून बसवेश्वरांचे आचार, विचार, कृती व तत्त्वज्ञान समकालीन वाटते.

आज जातीअंताचा लढा अधिक तीव्र करण्यासाठी, रूढी परंपरेला मूठ माती देण्यासाठी, धर्मांधर्मांतील अंतहीन लढाया थांबविण्यासाठी आणि माणसाला किमान माणूस म्हणून जाणून घेण्यासाठी बसवेश्वरांच्या विचाराशिवाय पर्याय नाही.

(लेखक संत साहित्याचे अभ्यासक आहेत.)

# राजर्षी शाहू महाराजांमुळेच बहुजन वृत्तपत्रांची भरभराट : डॉ. जत्राटकर

## शाहू महाराज पुण्यतिथीनिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजर्षी शाहू महाराजांनी तत्कालीन परिस्थितीत ब्रिटिश, अभिजन वर्गाचा दबाव असताना ब्राह्मणेतर वृत्तपत्र चालविणाऱ्यांना मदतीचा हात देण्याचे धोरण जावीणपूर्वक राबविले. त्यामुळेच या वृत्तपत्रांची भरभराट झाली. ब्राह्मणेतर चळवळ खेडोपाडी पोहोचली, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या ९७ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते.

डॉ. जत्राटकर म्हणाले, शाहू महाराजांनी बहुजन वृत्तपत्राबरोबर ग्रंथमाला, सुधारक यासारख्या अभिजन वृत्तपत्रांनाही मदत केल्याचे दाखले आहेत. बेळगाव येथील तरुण मंडळींनी सुरू केलेल्या राष्ट्रवीरला देखील त्यांनी मदत केली. शाहू महाराज वृत्तपत्रांना मदत करताना आपली बाजू मांडताना दिसतात. शाहू महाराजांचा आश्रय संपल्यानंतर काही वृत्तपत्रे बंद पडली. प्रास्ताविक डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले. राजदीप सुर्वे यांनी आभार मानले. यावेळी व्यंकाप्पा भोसले, डॉ. रत्नाकर पंडित, नामदेवराव कांबळे, प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील आदी उपस्थित होते.

Kolhapur Edition
7 May, 2019 Page No. 4
Powered by : erelego.com



# राजर्षी शाहू महाराज यांना आदरांजली

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
राजर्षी शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त महापालिका व जिल्हा प्रशासनाच्या वतीने दसरा चौक येथील राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यास महापौर सरिता मोरे व जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी पुष्पहार अर्पण करून आदराजंली वाहिली.

यावेळी प्र. कुलगुरू डॉ. डी. पी. शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. राणी काटे, मराठा महासंघाचे वसंतराव मुळीक, मोहामेडन एज्युकेशन सोसायटीचे कादर मलबारी, शाहू स्मारक व्यवस्थापक कृष्णाजी हारुगडे, युवराज कदम, डॉ. अशोक चौसाळकर, प्र. जनसंपर्क अधिकारी विजय वणकुद्रे आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाचा लवकरच तंजावर विद्यापीठाशी करार

## कुलगुरूंच्या तंजावर भेटीत यशस्वी चर्चा; सरस्वती महाल ग्रंथालयाशीही होणार करार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

तंजावर (तामिळनाडू) येथील तमिळ विद्यापीठ आणि सरस्वती महाल ग्रंथालय यांच्यासमवेत तंजावर पेपर्स आणि तंजावरी मराठी भाषा अभ्यासासंदर्भात सामंजस्य करार करण्याबाबत तमिळ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सी. बालसुब्रम्हण्यम यांच्याशी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची सकारात्मक चर्चा झाली. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी यासंदर्भात नुकतीच विद्यापीठाच्या अभ्यासकांसमवेत तंजावरला भेट दिली.

तंजावर येथील तमिळ विद्यापीठाने मराठा इतिहास आणि मराठी भाषेसंदर्भातील चाळीस हजारांहून अधिक कागदपत्रे जतन करून ठेवलेली आहेत. हे विद्यापीठ भाषेला केंद्रस्थानी ठेवून स्थापन करण्यात आले असून या विद्यापीठाकडून मोडी कागदपत्रांचे भाषांतर कार्यही मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे या विद्यापीठाशी तंजावर पेपर्स आणि तंजावरी मराठी भाषा अभ्यासासंदर्भात सामंजस्य करार शिवाजी विद्यापीठाच्या विचाराधीन होता. त्याचबरोबर सरस्वती महल ग्रंथालयात मोडी कागदपत्रांसह हजारो मराठी ग्रंथांचे जतन केलेले असल्याने संशोधकांना अभ्यासासाठी ते सहज उपलब्ध व्हावेत, यासाठी या ग्रंथालयाबरोबरही सामंजस्य करार करण्यात येणार आहे. त्या दृष्टीने तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयामध्ये बैठक झाली. सदर बैठकीमध्ये वरील सर्व मुद्द्यांसह तंजावरला मराठी अध्यासन आणि शिवाजी विद्यापीठात तमिळ अध्यासन स्थापन करण्यासंदर्भात विस्तृत चर्चा झाली. शिवाय शिवाजी विद्यापीठ नवे म्युझियम साकारत असून या म्युझियममध्ये तंजावर येथील मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित दालन उभारण्यासंदर्भातही सकारात्मक चर्चा झाली.



तंजावर : तमिळ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सी. बालसुब्रम्हण्यम यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत तंजावरचे शिवाजीराजे भोसले, कुलसचिव मुथ्थूकुमार, डॉ. अवनिश पाटील व डॉ. विवेकानंद गोपाळ.

यावेळी सरस्वती महल ग्रंथालयातील उपलब्ध अभ्यास साधनासंदर्भात तंजावरचे जिल्हाधिकारी ए. अण्णादुराई यांच्यासमवेतही स्वतंत्र बैठक झाली. दोन्ही बैठका तंजावरचे राजे शिवाजीराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झाल्या. या बैठकांना तमिळ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सी. बालसुब्रम्हण्यम, कुलसचिव मुथ्थुकुमार यांच्यासह तमिळ विद्यापीठातील डॉ. विवेकानंद गोपाळ, डॉ. जयकुमार, डॉ. कविता, डॉ. शीला, डॉ. नीलकंठ हे भारतीय भाषा आणि सामाजिक शास्त्राचे प्राध्यापक उपस्थित होते. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, समिती सदस्य डॉ. अवनीश पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. नीलांबरी जगताप आणि गणेश नेर्लेकर-देसाई उपस्थित होते.

**मराठ्यांच्या इतिहासात तंजावर महत्त्वाचे**

तमिळनाडूतील तंजावर येथे साडेतीनशे वर्षांपूर्वी इ.स. १६७६ ला मराठ्यांनी आपले राज्य स्थापन केले. शहाजीराजेंचे पुत्र आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे बंधू व्यंकोजी यांनी हे राज्य स्थापन केले. तेव्हापासून ब्रिटिशांनी १८५५ ला संस्थान खालसा करेपर्यंत तेथे मराठा अंमल होता. त्यामुळे तंजावर राजघराण्याचे हजारो पेपर्स, इतर ऐतिहासिक कागदपत्रे, वस्तू, शिल्पे, चित्र, शिलालेख, ग्रंथ अभ्यासणे हे मराठा इतिहासात महत्त्वाचे आहे. सर्फोजी (दुसरा) यांनी स्थापन केलेले सरस्वती महल ग्रंथालय जागतिक ठेवा ठरले आहे. हे हस्तलिखित ग्रंथांचे जगातील सर्वात मोठे ग्रंथालय असून माणसाच्या लेखन आणि पुस्तक निर्मितीच्या इतिहासाचा दस्तऐवज म्हणून जगभर नावाजलेले आहे. येथे रामायण, महाभारतापासून, विवेकसिंधू, भगवद्गीता या ग्रंथांची शेकडो हस्तलिखिते उपलब्ध आहेत.

# दमसा सभेचे ग्रंथ पुरस्कार जाहीर

## संग्राम गायकवाड, संपत देसाई, आलोक जत्राटकरांच्या पुस्तकांचा समावेश; रविवारी वितरण


संग्राम गायकवाड


संपत देसाई


आलोक जत्राटकर


दत्ता घोलप


दिनकर कुटे


महादेव कांबळे


गायत्री शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने देण्यात येणारे २०१८ मधील ग्रंथ पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले. हा पुरस्कार प्रदान समारंभ लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते रविवार, दि. १२ मे सकाळी ११ वाजता शाहू स्मारक भवन येथे होणार आहे.

यातील पुरस्कारप्राप्त पुस्तके आणि लेखक असे आहेत. देवदत्त पाटील पुरस्कार : आटपाट देशातल्या गोष्टी (कादंबरी) - संग्राम गायकवाड. शंकर खंडू पाटील पुरस्कार : कायधूळ (कथासंग्रह) - दिनकर कुटे. अण्णा भाऊ साठे पुरस्कार : एका लोकलढ्याची यशोगाथा (अनुभव कथन) - संपत देसाई. कृ. गो. सूर्यवंशी पुरस्कार : मराठी कादंबरी - आशय आणि आविष्कार (संकीर्ण) - दत्ता घोलप. चैतन्य माने पुरस्कार (प्रथम प्रकाशन) निखळ जागर संवेदनांचा - आलोक जत्राटकर. शैला सायनाकर पुरस्कार : वेदनांकित घुंगरांचे संदर्भ (काव्य) - महादेव कांबळे. बालवाङ्मय पुरस्कार : माझा राजा शाहूराजा - गायत्री शिंदे.

याशिवाय डॉ. गो. मा. पवार पुरस्कार : मराठीतील कलावादी समीक्षा - वि. दा. वासमकर, डॉ. विजय निंबाळकर पुरस्कार : सम्यक समीक्षा - संजय कांबळे, वाळवाण - रवी राजमाने, महाप्रस्थान - भास्कर जाधव, वर्तमानाचे टोक - जीवन साळोखे, चैत्रपालवी - श्रीधर कुदळे, समकालीन मराठी साहित्य - संपा. दत्ता पाटील, नीलेश शेळके, मनी मानसी - ऊर्मिला आगरकर, आजीची पोथडी - दत्तात्रय मानुगडे, जॉयस्टिक - सोनाली नवांगुळ, सह्याद्रीच्या खोऱ्यात - रघुराज मेटकरी, ऋतुफेरा - सलीम सरदार मुल्ला, काळीजकाटा - सुनील जवंजाळ, महर्षी महेश योगी - सुनील पाटील, गाऱ्हाणं - धनाजी घोरपडे, ओळंबा - महेशकुमार कोष्टी, डोन्ट वरी बी हॅप्पी - सविता नाबर, काव्यांजली - अंजली देसाई, होरपळ आणि हिरवळ - योजना मोहिते, कॉ. धनाजी गुरव यांची मुलाखत - संपा. प्रशांत नागावकर, किलबिल गोष्टी - कबीर वराळे, मिथकांचा रंगाविष्कार - दिनेश वाघुंबरे, निळ्या लाटा - प्रमोद बाबर, बंधन -किरण कुलकर्णी यांचाही समावेश आहे.

दमसा सभेच्या वतीने दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यांसह कर्नाटकस्थित मराठी लेखकांच्या उत्कृष्ट साहित्यकृतींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. २०१८ या वर्षात प्रसिद्ध झालेली ९२ पुस्तके पुरस्कारासाठी प्राप्त झाली होती, अशी माहितीही साहित्य सभेच्या उपाध्यक्ष गौरी भोगले, सहकार्यवाह डॉ. विनोद कांबळे यांनी केले आहे.



कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहूंना अभिवादन करताना महापौर सरिता मोरे व जिल्हाधिकारी दौलत देसाई.

# महापालिकेतर्फे पुण्यतिथीनिमित्त राजर्षी शाहूंना आदरांजली

कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त महापालिका व जिल्हा प्रशासनातर्फे आज दसरा चौक येथील राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यास महापौर सरिता मोरे व जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. [illegible], मराठा महासंघाचे वसंतराव मुळीक, [illegible] शाहू स्मारक व्यवस्थापक [illegible], डॉ. [illegible], प्र. जनसंपर्क अधिकारी [illegible] आदी उपस्थित होते.

सकाळ

# डॉ. पवार इतिहास घडविणारे इतिहासकार : डॉ. पाटील

## प्रा. कुराडेलिखित चरित्रग्रंथाचे गडहिंग्लजला प्रकाशन

गडहिंग्लज, ता. ६ : प्राध्यापक, शिक्षण संचालक व शिवाजी विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू या भूमिका पार पाडताना आणि महाराष्ट्राच्या इतिहासाचे सखोल संशोधन करीत असताना डॉ. आप्पासाहेब पवार यांनी ऐतिहासिक कामगिरी केली. म्हणूनच त्यांना इतिहास घडविणारे इतिहासकार मानले जाते, असे मत डॉ. आनंदराव पाटील यांनी व्यक्त केले.

प्रा. किसनराव कुराडे यांनी लिहिलेल्या 'गुरुकुलातील कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार' या चरित्रग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. पवार यांच्या जयंतीनिमित्त डॉ. आप्पासाहेब पवार प्रबोधिनी व शिवाजी विद्यापीठ कमवा व शिका योजनेतर्फे हा प्रकाशन सोहळा झाला. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमात डॉ. सी. टी. पवार, प्राचार्य सरगर, डॉ. नाईक, लेखक प्रा. कुराडे यांची भाषणे झाली. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. एस. टी. हजारे, लेखक जी. पी. माळी, डॉ. जगताप, प्रा. लिपारे, युवराज कदम उपस्थित होते.




**कोल्हापूर : प्रा. किसनराव कुराडेलिखित डॉ. आप्पासाहेब पवार चरित्रग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. आनंदराव पाटील, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, लेखक प्रा. कुराडे आदी.**

17 MAY 2019


तरुण भारत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# 'दमसा'चे पुरस्कार जाहीर


संग्राम गायकवाड


दिनकर कुटे


संपत देसाई


दत्ता घोलप


अलोक जत्राटकर


महादेव कांबळे

प्रतिनिधी
कोल्हापूर

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या २०१८ मधील ग्रंथ पुरस्कारासाठी संग्राम गायकवाड, दिनकर कुटे, संपत देसाई, दत्ता घोलप, अलोक जत्राटकर, महादेव कांबळेसह आदिंच्या पुस्तकांची निवड करण्यात आली आहे. पुरस्कार प्रदान समारंभ डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते रविवार १२ रोजी शाहू स्मारक भवन येथील मिनी सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. दरवर्षी पश्चिम महाराष्ट्रासह कर्नाटकस्थित मराठी लेखकांच्या उत्कृष्ट साहित्यकृतींना पुरस्कार दिला जातो. २०१८ या वर्षात ९२ पुस्तके पुरस्कारासाठी प्राप्त झाली होती. पुरस्कार प्रदान समारंभासाठी साहित्य प्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन साहित्य सभेच्या उपाध्यक्ष गौरी भोगले, सहकार्यवाह डॉ. विनोद कांबळे यांनी केले.

**पुरस्कार प्राप्त पुस्तके आणि लेखकांची नावे**

देवदत्त पाटील पुरस्कार: आटपाट देशातल्या गोष्टी (कादंबरी) संग्राम गायकवाड, शंकर खंडू पाटील पुरस्कार – कायधूळ (कथासंग्रह) दिनकर कुटे,

अण्णा भाऊ साठे पुरस्कार : एका लोकलढयाची यशोगाथा संपत देसाई. कृ. गो. सूर्यवंशी पुरस्कार: मराठी कादंबरी –आशय आणि अविष्कार (संकीर्ण)–दत्ता घोलप, चैतन्य माने पुरस्कार:निखळ जागर संवेदनांचा–अलोक जत्राटकर,

शैला सायनाकर पुरस्कार:वेदनांकित घुगरांचे संदर्भ– महादेव कांबळे, बालवाङ्मय पुरस्कार– माझा राजा शाहूराजा– गायत्री शिंदे.

विशेष पुरस्कार : डॉ. गो. मा. पवार पुरस्कार: मराठीतील कलावादी समीक्षा– वि. दा. वासमकर,

डॉ. विजय निंबाळकर पुरस्कार: सम्यक समीक्षा –संजय कांबळे, वाळवाण –रवी राजमाने, महाप्रस्थान–भास्कर जाधव, वर्तमानाचे टोक जीवन साळोखे, चैत्र पालवी–श्रीधर कुदळे, समकालीन मराठी साहित्य: दत्ता पाटील– नीलेश शेळके, मनी मानसी –ऊर्मिला आगरकर, आजीची पॉथडी –दत्तात्रय मानुगडे, जॉयस्टिक–सोनाली नवांगुळ, सहयाद्रीच्या खोऱ्यात–रघुराज मेटकरी, ऋतूफेरा–सलीम सरदार मुल्ला, काळीजकाटा– सुनिल जंवजाळ, महर्षी महेश योगी–सुनिल पाटील, गाऱ्हाणं–धनाजी घोरपडे, ओळंबा–महेशकुमार कोष्टी, डोन्ट वरी बी हॅपी – सविता नाबर, काव्यांजली –अंजली देसाई, होरपळ आणि हिरवळ– योजना मोहिते, कॉ. धनाजी गुरव यांची मुलाखत –प्रशांत नागावकर, किलबिल गोष्टी –कबीर वराळे, मिथकांचा रंगाविष्कार –दिनेश वाघुबरे, निळया लाटा –प्रमोद बाबर, बंधन –किरण कुलकर्णी